**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, JULY-AUGUST, 2022, VOL- 10/72*

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे सामाजिक कार्य : एक अध्ययन

**प्रा. कार्तिक पाटील**
*सहयोगी प्राध्यापक तथा मराठी विभाग प्रमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्यालय, चिमूर, जि. चंद्रपूर*

**Paper Received On:** 25 JULY 2022
**Peer Reviewed On:** 31 AUGUST 2022
**Published On:** 01 SEPTEMBER 2022

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्रातील एक आधुनिक संत, भक्त, कवी आणि समाजसुधारक म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा उल्लेख केला जातो. आपल्या विचार आणि भजनातून आदर्श ग्राम व आदर्श नागरिक घडवण्यासाठी आयुष्यभर परिश्रम करणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा जन्म महाराष्ट्र राज्यातील अमरावती जिल्ह्यातील यावली शहीद या गावी वैशाख शुद्ध सप्तमीला ३० एप्रिल १९०९ रोजी झाला. त्यांचे मूळ नाव माणिक बंडोजी ठाकूर असे होते. त्यांचे वडील बंडोजी ठाकूर हे गुळाचा व्यापार व शिंप्याचा व्यवसाय करीत पण त्यांची मिळकत अपुरी पडत असे. त्यामुळे माणिकची आई मंजुळाबाई यादेखील दळण, कांडण करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असे. ठाकूर घराण्याचे कुलदैवत पंढरपूरचा विठोबा असल्याने लहानपणापासून त्यांना भजन, कीर्तन, पूजन , ध्यास या गोष्टीची आवड निर्माण झाली.[१]शालेय शिक्षणात माणिकचे मन कधीच रमले नाही. शालेय शिक्षणाच्या ३ री इयत्ता करण्यासाठी त्यांना वरखेड, यावली, चंदुरबाजार अशी त्रिस्थळी भ्रमंती करावी लागली होती. कथा सांगणे, गणित सोडवणे, अभंग रचणे हे त्यांच्या आवडीचे छंद होते. कोणतीच अपेक्षा न ठेवता सेवाभावी कृतीतून ते सर्वांबरोबर काम करीत असत. यावलीचेसातळीकोतळीकर महाराजांपासून त्यांना अध्यात्मिक ज्ञान साधनेचा छंद लागला.२ तसेच चांदूरबाजारात असताना भारतीबुवाकडून त्यांनी गायन व वादनाची कला अवगत केली.

एकदा माणिकची आई मंजुळाबाई माणिकला घेऊन अडकोजी महाराजांच्या दर्शनाला वरखेडला गेली होती. त्यावेळी अडकोजी महाराजांनी माणिकच्या तोंडात भाकरीचे तुकडे कोंबले व माणिकला "तुकड्या तुकड्या"असे म्हणू लागले. त्यानंतर माणिकचे माणिक हे नाव मागे पडले व तुकड्या आहे नाव प्रसिद्ध झाले. माणिकने अडकोजी महाराजांचे शिष्यत्व पत्करले. आपल्या गुरूला गोड गळ्याने तुकारामाची व इतर संतांची भजने ऐकावीत हा त्यांचा छंद होता. तुकारामाच्या भजनातील तुका म्हणे, तुका म्हणे याबद्दल कंटाळा आल्याने अडकोजी महाराजांनी माणिकची

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

योग्यता ओळखून माणिकला स्वतःची भजने रचण्यास प्रोत्साहित केले.३ त्यावेळेपासून माणिक तुकड्यादास म्हणे , अशी रचना करून प्रत्यक्ष भक्तिभावाने ओथंबलेले भजनाचे अनेक विषय पुढे येऊ लागले.

ज्यावेळी सन १९२१ मध्ये अडकोजी महाराजांनी विदेही स्वरूपातच समाधि घेतली त्यावेळी तुकडोजी महाराजांना आपल्या जीवनात प्रचंड पोकळी निर्माण झाल्याची जाणीव झाली. मनामध्ये विविध समस्याचे काहूर माजू लागले. मनाची शांती ढळू लागली. तेव्हा तुकडोजींनी पंढरपूरला जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेतले. पण तिथे भक्त पुंडलिकांनी केलेली मातापित्यांची सेवा त्यांच्या मनात जागृत झाली तेव्हा आई-वडिलांच्या आठवणीने पुढे ते आपल्या जन्मगावी यावलीला आले. यावलीला आल्यानंतर त्यांनी काही दिवस आपल्या पित्याला व्यवसायात मदत केली. पण तिथेही त्यांचे मन रमले नाही. अस्वस्थ मनाच्या अवस्थेत त्यांनी वयाच्या १४ व्या वर्षी रामटेकला नारायण टेकडीकडे प्रयाण केले. या रामटेकच्या घनदाट जंगलात त्यांनी परमेश्वराची ध्यानसाधना सुरू केली व खंजिरीच्या निनादत ते परमेश्वराची भक्ती करू लागले. त्यांचा हा दिनक्रम नित्यक्रम बनला.४

थोड्याच कालावधीत तुकडोजी महाराज यांनी चिमूर जवळील ताडोबाच्या घनदाट जंगलात त्यांनी आपली ध्यानसाधना चालू ठेवून तेथे देवबाबा या नावाने कीर्ती संपादन केली. तेथील नेरी खेड्यातील एका शिक्षिकेची एकही मूल जगात नव्हते म्हणून खेड्यातील एका बाईच्या सल्ल्यावरून मुले वाचवण्याचा हमखास उपाय म्हणून त्या आजारी मुलावरून विष ओवाळून दुसऱ्यांना देणे हा विषप्रयोग तुकडोजी महाराजांवर झाला. पण खरंच परमेश्वराला तुकडोजी महाराजांच्या हातून काहीतरी सत्कार्य करून घ्यायचे होते म्हणून या विषप्रयोगातूनही ते सहीसलामत जिवंत राहिले.५ म्हणजेच विषप्रयोग करणाऱ्या लोकांवरही दया दाखवण्याचा मोठेपणा नेरी येथील गावात तुकडोजी महाराजांना प्राप्त झाला.

तुकडोजी महाराजांचे कवित्व अस्सल आहे. किर्तन आणि खंजिरी भजन यांच्या माध्यमातून समाजसेवा हेच तुकडोजी महाराजांचे ध्येय होते. त्यासाठी परंपरागत अनिष्ट रूढी, जातीधर्म पंथभेद, अंधश्रद्धा इ. समाजघातक गोष्टीवर कठोर प्रहार करून ईश्वराचे विशुद्ध स्वरूप त्यांनी लोकांसमोर मांडले. त्यामुळे सर्व धर्माचे, सर्व पंथाचे लोक त्यांच्याकडे आकर्षित झाले. आत्मसंयमाचा आणि देशभक्तीचा प्रचार करण्यासाठी त्यांनी अविश्रांत श्रम केले. तसेच गावोगावी "गुरुदेव सेवा मंडळे" स्थापन केली.६व्यायामाचे महत्त्व सांगण्यासाठी त्यांनी,"आदेशरचना"हा ग्रंथ लिहिला. सन १९३५ मध्ये ज्यावेळी तुकडोजी महाराज सालबर्डी येथे मुक्कामी होते तेव्हा त्यांच्या सालबर्डी येथील अपूर्व यज्ञामुळे त्यांचे सोज्वळ व्यक्तिमत्व लोकांपुढे आले आणि तमाम जनतेचे श्रद्धास्थान बनले. सालबर्डी परिसरातील जनतेची प्रापंचिक, परमर्थिक देव भक्ती व देशभक्ती अशी विसंगत व भ्रमिष्ट स्थिती लक्षात घेऊन ती दूर करण्यासाठी सर्वांना एकाच छताखाली आणणारे धार्मिक माध्यम त्यांनी निश्चित केले. त्याचप्रमाणे चातुर्मास, यज्ञ, भजने, सप्ताह या जुन्या साधनातून नवीन विचार लोकांमध्ये

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

रुजविण्यास सुरुवात केली. यातूनच त्यांनी गावोगावी आरती मंडळ व भजनी मंडळ स्थापन करून धार्मिक लोकांची संघटना स्थापन केली. मोझरी येथे धर्म सेवाभाव व ग्रंथ प्रकाशन कार्य सुरू करून समाजप्रेमी लोकांना जोडण्याचे कार्यही तुकडोजी महाराजांनी केले.७ यावरून राष्ट्रसंतांचे जीवन कशा प्रकारे विकसित होत गेले याची प्रचिती येते.

एकूणच तुकडोजी महाराज हे विवेकनिष्ठ जीवन सृष्टीतून एकेश्वरवादाचा पुरस्कार करीत असत. आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी आपल्या प्रभावी खंजिरी भजनाच्या माध्यमातून त्यांना अभिप्रेत असलेल्या विचारसरणीचा प्रचार करून त्यांनी अध्यात्मिक, सामाजिक व राष्ट्रीय प्रबोधन केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे सामाजिक विचार प्रचंड मोलाचे व मूलगामी स्वरूपाचे आहेत त्यामुळे काळ आणि परिस्थिती बदलली तरी एखाद्या इतिहासकाराला त्यांच्या सर्व क्षेत्रातील विचारांचा आढावा घेतल्याशिवाय पुढे जाता येत नाही. श्रम प्रतिष्ठा व ज्ञाननिष्ठा यांच्या समन्वयातून निर्माण झालेल्या या विचारात समाज परिवर्तनाची ताकत आहे. व्यक्ती व्यक्ती मिळून समाज बनत असतो परंतु तुकडोजी महाराजासारखी एखादी व्यक्ती वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाने व प्रभावी कार्य प्रणवतेने , प्रगल्भ विचार सारणीने समाजात अंतर्बाह्य बदल घडवून आणते. ८ थोडक्यात अज्ञान, अंधश्रद्धा व अनिष्ट रूढी यांची समाजाला लागलेली कीड दूर करण्याचे, समाजाच्या अंतरंगात भिनलेले विकृत विचारांचे रोग जंतू टिपून त्यावर भजन, भाषण व प्रवचनद्वारे हल्ला चढवण्याचे सामाजिक सुधारण्याचे कार्य तुकडोजी महाराजांनी केले. त्याहीपेक्षा "बोले तैसा चाले त्याची वंदावी पावले"........ या उक्ती प्रमाणे समाजमन विकसित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्यही त्यांनी केल्यामुळे त्यांच्या सामाजिक विचारांना अधिकच बळकटी प्राप्त होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी सामुदायिक प्रार्थनेचा पायंडा पाडलेला होता. समाजाने एकत्र यावे, समाजात कोणत्याही प्रकारचा भेदभाव नसावा, सर्वजाती-धर्माच्या लोकांनी समाजात एकत्र नांदावे ही त्यामागची त्यांची भूमिका होती. यावर आधारित ग्रामोन्नतीचा संदेश देणारी चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी तालुक्यात अड्याळ टेकडी ही अतिशय विलोभनीय, दिमाखदार, प्रेरणादायी व आदर्श ग्रंथ निर्मितीचे केंद्र मानले जाते.९ अशाप्रकारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी काया, वाचा आणि मन शाबूत ठेवून देशसेवा केली. आपल्या वाणी आणि लेखणीद्वारे सर्व धर्म सम भावाचे, राष्ट्रीय एकात्मतेचे, देश जागृतीचे , ग्रामोउद्याचे व सामाजिक बांधिलकीचे कार्य त्यांनी केले. त्यांची सामाजिक कार्य संपदा अतिशय उल्लेखनीय होती त्यामध्ये रुढी निर्दालन, दत्तक प्रथा, महिलान्नती, व्यसनमुक्ती, आर्थिक विषमता, समाजप्रबोधन व आदिवासी सुधारणायांचा उल्लेख करावा लागतो. समाजातील अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा, कर्मकांडे व अंधश्रद्धा या विरुद्ध पेटून उठणारे ते अधुनिक संत त्याचबरोबर थोरसमाज सुधारक होते.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

त्यांच्या रुढी निर्दालन या सामाजिक कार्यामध्ये त्यांनी समाज स्वास्थ्य, समाज स्थैर्य व सामाजिक व्यवस्थेच्यादृष्टीने आवश्यक असलेल्या विवाह संस्कारातील अनेक अनिष्ट व निष्क्रिय रुढी, प्रथा, परंपरा या नष्ट केल्या तसेच वेळेचा आणि पैशाचा अपव्यय होवू न देता कमी खर्चाची विवाह पद्धती त्यांनी तयार केली. याच विवाह पद्धतीच्या आधारे त्यांनी अनेक सामुदायिक विवाह घडवून आणले. पूर्वीपासून चालत आलेल्या बालविवाहाच्या प्रथेला त्यांनी कडाडून विरोध केला व स्त्रियांमधील पडदा पद्धतीवरही हल्ला चढवला. त्यांनी विजोड विवाहावर घणाघाती टिका केली.१० याचबरोबर त्यांनी हुंड्यासारख्या अनिष्ट प्रथेचाही जोरदारपणे निषेध केलेला होता.

एकंदरीत त्यांच्या सामाजिक कार्यामध्ये दत्तक प्रथा याचाही विचार करावा लागतो." पुत्राम नरकात त्रायते पुत्र" पुत्र हाच नरकातून तारुण नेतो ही संकल्पना धर्मशास्त्राने रुढ केल्यामुळे समाजात मुलगा दत्तक घेण्याची प्रथा मोठ्या प्रमाणात वाढली. या दत्तक घेण्याच्या विचारसरणीला तुकडोजी महाराजांनी मोठ्या प्रमाणात धक्का दिला. या दत्तक पुत्रामुळे निर्माण होणाऱ्या समस्याचे चित्र त्यांनी जनतेसमोर आणले.११ याशिवाय सर्वात महत्त्वाचे म्हणून अनेक निपुत्रिक श्रीमंताच्या संपत्तीचा ओघ समाजकार्याकडे व राष्ट्रकार्याकडे नेवून तुकडोजी महाराजांनी विघातक कार्य घडवून आणले.

तुकडोजी महाराजांच्या सामाजिक कार्य संपदेमध्ये महिला उन्नतीच्या कार्याचाही मोठा वाटा होता. समाजातील समाज व्यवस्था, कुटुंब व्यवस्था व राष्ट्र व्यवस्था ही स्त्रीवर कशी अवलंबून असते हे त्यांनी आपल्या कीर्तनाद्वारे समाजाला पटवून दिले. त्यामुळे स्त्रीला अज्ञानात व गुलामगिरीत ठेवणे कसे अन्यायकारक आहे हे देखील त्यांनी अत्यंत प्रभावीपणे पटवून दिले.१२ बऱ्याच ठिकाणी त्यांनी स्वतः श्री गुरुदेव सेवाश्रमात महिला मंडळे चालवली आणि त्यांच्याद्वारे शिक्षण, गृहकार्य, शिशु संगोपन, व्यायाम, सांघीक कवायत, लाठीकाठी व ग्रामसफाईचे कार्य सुरू केले. तसेच कला प्रदर्शन, रांगोळी स्पर्धा, आदर्श ग्रह स्पर्धा इ. स्पर्धा घेण्यात येऊन त्याद्वारे ग्रामीण विभागातील महिलांना टापटीप व स्वच्छता यांचे शिक्षणही देण्यात आले.

तुकडोजी महाराजांना सामाजिक सुधारण्याचे प्रचंड वेड होते. त्याच्या निमित्ताने ते तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचलेले होते. त्यांचा सामाजिक कार्य संपदेमध्ये व्यसन मुक्तीचाही महत्त्वाचा भाग होता. माणसाला व्यसनमुक्त बनवून देश सुधारण्याचे प्रयत्न चालू असतानाच दारूवरील बंदी उठवणे कसे धोक्याचे आहे त्यामुळे ओढावणाऱ्या आपत्ती व दुष्परिणामाची यादी सरकार समोर सादर केली. तसेच त्यावर फेरविचार करण्याची सरकारला विनंती केली होती.१३ याशिवाय तुकडोजी महाराज देशातील तरुणपिढीला राष्ट्राचे भावी आधारस्तंभ मानत असत. ते बालोपासक असावेत म्हणजे ते समाजाचे व राष्ट्राचे संरक्षण करू शकतील. ते नीतिमान व

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

सुसंस्कृतयुक्त कसे होतील याविषयीचे उपदेशपर व मार्गदर्शनपर लेखनही तुकडोजी महाराजांनी केले आणि आपल्या लेखनातून त्यांनी व्यसनाधीनतेचा तीव्र निषेध व्यक्त केला.

तुकडोजी महाराज यांनी त्यांच्या सामाजिक कार्याबरोबर राष्ट्रीय आंदोलनात म्हणजे आचार्य विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीतही भाग घेतला होता. भारत हा खेड्यांचा देश आहे हे लक्षात घेऊन ग्रामविकास झाला की राष्ट्राचा विकास होईल अशी त्यांची विचारसरणी होती. ग्रामोन्नती व ग्रामकल्याण हा त्यांच्या सामाजिक सुधारणेचा जणू केंद्रबिंदूच होता. खेडे स्वयंपूर्ण कशी होतील याविषयीजी उपायोजना तुकडोजी महाराजांनी सुचवली ती अतिशय परिणामकारक ठरली. जुनाट, कालबाह्य अंधश्रद्धा नाहीशा व्हाव्यात याविषयी त्यांनी अविरत प्रयत्न केले होते. सर्व धर्म समभाव हे तुकडोजींच्या विचार विश्वाचे एक वैशिष्ट्य होते. त्यांच्या सामाजिक कार्यसंपदेमध्ये देशाच्या आर्थिक विषमतेवरही भर देण्यात आला होता. औद्योगिक क्रांती व भांडवलशाही समाजरचनेमुळे श्रीमंत हे श्रीमंतच बनत गेले तर गरीब आहे अधिकाधिक गरीब झाले. तेव्हा श्रीमंत गरिबांचा वाद यांच्यामध्ये उठा, उठा श्रीमंतांनो असे म्हणून त्यांनी गरिबांना कार्यप्रवृत्त केले.१४ अशारीतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी खेड्यापाड्यात जाऊन आदर्श ग्रामरचनेचे शिक्षण लोकांना दिले.

एकंदरीत यांचे सर्व क्षेत्रातील कार्य सर्वश्रेष्ठ असेच होते. त्याकाळात त्यांनी समाज प्रबोधनाचे अखंड कार्यही पार पाडले. ज्यावेळी तुकडोजी महाराजांनी समाज प्रबोधनाला सुरुवात केली त्यावेळी भारत देश हा इंग्रजांच्या जुलमी अत्याचारी जोखडाखाली भरडलेला होता. जर राष्ट्रप्रेम निर्माण करायचे असेल तर आधी गुलामगिरीच्या बेड्या व जोखंड भिरकावून द्यावे लागतील तसेच समाजातील सर्व निरक्षर जनतेला साक्षर करावे लागेल. अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरेचा समाजाच्या मनावर असलेला पगडाही दूर करावे लागेल ही त्यांची विचार सरणी होती.१५ एकूणच देशातील तरुणांनी आधुनिक विचाराकडे तसेच इंग्रजांच्या अत्याचारा विरुद्ध जागवण्याचे कार्य तुकडोजी महाराजांनी केले.

तुकडोजी महाराजांच्या कार्यसंपदेमध्ये आदिवासीच्या सुधारण्याचाही भाग होता. सामाजिक सुधारणा करताना ते तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचले होते. त्यांच्या ग्रामगीतेत त्यांनी आदिवासी सुधारणेचाही उल्लेख केला आहे. "काहीनी करावा आदिवासी सुधार/ जावोनी रानी खेड्यावर/ पहावे गरीब जनतेचे कुटील कैसे आहे//१६ शेकडो वर्षे लोटून गेली परंतु आदिवासी समाज आजही जंगल पहाडाच्या आस-याने पशुसारखे जीवन जगताना दिसतो. निसर्गाच्या मर्जी लहरीनुसार त्याचे व्यवहार चालतात. निसर्ग हाच त्यांचा दाता आणि पाठीराखाही आहे असे ते मानत असत.१७ एकूणच आदिवासी समाजाला समाज जीवनात व राष्ट्रीय प्रवाहात कसे आणावे आणि त्यांचा विकास कसा घडवून आणावा यासाठी सुद्धा त्यांनी प्रचंड प्रयत्न केले होते.

अशाप्रकारे त्यांचे सामाजिक कार्याबरोबरच त्यांचे राष्ट्रीय कार्यही अत्यंत महत्त्वाचे होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर त्यांनी ग्रामीण भागाच्या पुनर्निर्माणावर आपले लक्ष केंद्रित केले व अखिल भारतीय

Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

श्री गुरुदेव सेवा मंडळाची स्थापना केली. त्यांनी ग्रामीण विकासासाठी अनेक कार्यक्रम विकसित केले. त्यांची क्रियाशीलता व वैचारिकता एवढी प्रभावशाली होती की राष्ट्रपती भवनात झालेले त्यांचे खंजिरी भजन ऐकून डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी तुकडोजी महाराजांना राष्ट्रसंत ही उपाधी सन १९४९ साली प्रदान केली.

एकंदरीत मानवतेचे महान पुजारी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे संपूर्ण जीवनमान व जातीचा कल्याणाकरिता चंदनाप्रमाणे झिजवून आपले विचार जनतेपर्यंत पोहोचवण्याचे महान कार्य केले. त्यांच्यामध्ये संत नामदेवांची उत्कट भक्ती, संघटनशैली व लोकजागृतीची तळमळ याचबरोबर ज्ञान देवांची ज्ञानकता, संत तुकारामाची स्वयंपूर्ण शब्दसिद्धी व शब्दशस्त्रांची हुकमी फेक, रामदासांची राष्ट्रनिष्ठा व अवैदिक संप्रदायाचा कस तसेच संत गाडगेबाबा प्रमाणे जीवन द्रोही रूढींना तिलांजली देण्याची प्रवृत्ती, महात्मा गांधीजींचे अनुशासन प्रियता, साधेपणा तर लोकमान्य टिळकांची प्रखर राष्ट्रीयता व वैश्विक मानवतावाद, साने गुरुजींच्या स्वभावातील मातृस्वरूप करूणा, तर शाहू, फुले व आंबेडकर यांचा प्रखर व कृतिशील मानवतावाद अशा सर्व संत आणि समाजसुधारकांच्या उत्तम गुणांचा सुंदर मिलाफ राष्ट्रसंत तुकडोजी महाराजामध्ये झालेला होता. त्यामुळे त्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व हे भारतीय जनसंस्कृतीच्या अंतप्रवाहात एक दुर्मिळ संयोग असल्याचे दिसून येते. अशा या समाजप्रेमी , राष्ट्रप्रेमी समाज सुधारकाचा व संताचा ११ ऑक्टोबर १९६८ मध्ये कर्करोगाने अंत झाला. त्यांच्या निधनाने एका राष्ट्र निर्मात्याचा, समाज कर्त्याचा व आधुनिक विचारवंताचा सुर्यास्त झाल्याची जाणीव मात्र समाज मनात अजूनही कायम राहिली आहे.

## संदर्भ साधने

*तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी- मराठी विश्वकोश खंड ७, सचिव महाराष्ट्र राज्य, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, प्रथमावृत्ती १९७७.*

*ना. ग. पवार- शिक्षण क्षेत्रातील विचारवंत, नूतन प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती जानेवारी १९९५ पृ.क्र. ८२*

*तत्रैव पृ.क्र. ८३*

*तत्रैव पृ. क्र. ८४*

*सुभाष सावरकर- अक्षर वैदर्भी मासिक जानेवारी ते मार्च २०००, जनसाहित्य भवन, अमरावती, पृ.क्र. ८२.*

*तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी उपरोक्त पृ. क्र. १८३.*

*दीपक गडलिंग- स्मृतिगंध विशेषांक, गुरुकुंज प्रकाशन समिती, गुरुकुंज आश्रम मोझरी, अमरावती पृ.क्र. ७७.*

*कुमुदिनी खैरगडे- राष्ट्रसंत तुकडोजी यांच्या समग्र वाङ्मयाचे चिकित्सक अध्ययन, प्रथमावृत्ती १९८४, कृष्णविलास प्रकाशन, अमरावती पृ. क्र १११*

*सागर कुंटे - संपादकीय लेख, महाराष्ट्र टाइम्स, नागपूर आवृत्ती, १२ ऑगस्ट २०१७*

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

*कुमुदिनी खैरगडे- उपरोक्त पृ. क्र. ११२*

*कित्ता- पृ.क्र. ११३*

*विकिपीडिया - तुकडोजी महाराज*

*कुमुदिनी खैरगडे- उपरोक्त पृ. क्र. ११३, ११७*

*विजय गिललकर - स्मृतिगंध विशेषांक, गुरुकुंज प्रकाशन समिती, गुरुकुंजआश्रम, मोझरी, अमरावती पृ. क्र. ११*

*विकिपीडिया- तुकडोजी महाराज*

*महाराज श्री संत तुकडोजी - ग्रामगीता प्रकाशन समिती, नागपूर, अध्याय २७, ओवी ७०, पृ.क्र. २५१.*

*विनायक तुमराम - श्री गुरुदेव, श्री. गुरुकुंज प्रकाशन समिती, गुरुकुंज आश्रम मोझरी, अमरावती पृ. क्र. ११, १२.*